However, the abovenamed member is not traceable and/or his whereabouts are not known and there has been no communication of any nature of the member with the society. The society gave a public notice earlier as unscrupulous elements and imposters have been visiting the society premises claiming to be the legal heirs and family members and members of public were warned not to deal or entertain such person/s and report to the society.

No Legal Heirs have contacted the society as of date.

As such to safe gaurd and secure the premises concerned members of public are hereby warned not to deal with the said shops and note that the society shall be taking all appropriate steps to secure and take over the charge and possession of the said shops without any further notice.

Dated the 5th day of November, 2019.

Hon. Secretary
Ashoka Shopping Centre Premises Co-op. Society Ltd.

epaper.freepressjournal.in

भारत गिअर ते दिवा रस्त्याची दुरवस्था

वार्ताहर

ठाणे, दि. ४ – ठाणे महापालिका प्रशासनाच्या लेट लतीफ कारभाराचा नमुना समोर आला आहे. दिवा प्रभाग समिती क्षेत्रातील भारत गिअर कंपनी ते दिवा या तब्बल १७०० मीटर लांबीच्या रस्त्याचे काँक्रीटीकरण व डांबरीकरण करण्याचा प्रस्तावाला आठ महिन्यापूर्वी मंजुरी मिळाली. मात्र, आजपर्यंत हा रस्ता जैसे थे अवस्थेत असल्याचे उघडकीस आले आहे.



या रस्त्याच्या कामांचे कार्यादेश दिल्यानंतरही कामाला मुहूर्त मिळत नसल्याने संबंधित पालिका अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादीच्या स्थानिक नगरसेविका सुलोचना हिरा पाटील यांनी आयुक्त संजीव जयस्वाल यांच्याकडे केली आहे. तर दिव्यावर हक्क सांगणारे नेते आणि नगरसेवक कोमात गेले काय? असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत.

ठाणे महापालिकेच्या दिवा आणि मुंब्रा प्रभाग समितीच्या वेशीवर भारत गिअर कंपनी ते दिवा याना जोडणारा सुमारे दिड किलोमीटर लांबीचा रस्ता आहे.या रस्त्याची दुरवस्था बनली असून पावसाळयात या रस्त्यावर चिखल तर उन्हाळ्यात धुळीचे साम्राज्य असते. त्यामुळे येथून मार्गक्रमण करणाऱ्या रहिवाश्याच्या अक्षरशः नाकीनऊ येत आहेत.या रस्त्यावरून दिवा उपनगराकडे आणि शिळफाटाकडे वाहनांची वर्दळ असते. त्यामुळे येथून वाट काढताना वाहन चालकांची दमछाक होत आहे. वर्षभरापूर्वी पालिका आयुक्त जयस्वाल यांनी या रस्त्याची पाहणी करून तातडीने रस्त्याच्या दुरुस्तीचे आदेश दिले होते. त्यानंतर आठ महिन्यापूर्वी महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत या रस्त्याच्या प्रस्तावाला मंजुरी मिळून ठराव पारित करण्यात आला. त्यानुसार, संबंधित ठेकेदारास कार्यादेशदेखील देण्यात आला. मात्र, आजतागायत या रस्त्याचे तसूभरही काम झाले नसल्याची तक्रार राष्ट्रवादीच्या स्थानिक नगरसेविका सुलोचना हिरा पाटील यांनी आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे. सर्वसाधारण सभेमध्ये पारित झालेल्या ठरावानुसार रस्त्याचे काम तातडीने हाती घेणे गरजेचे होते.

परंतु, संबंधित अधिकारी वर्ग आयुक्तांच्याआदेशाचे किंबहुना सभागृहाच्या ठरावाचे पालन करीत नसल्याचे दिसून येत असल्याने संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी पाटील यांनी निवेदनात केली आहे.

दरम्यान, यासंदर्भात दिवा प्रभाग समितीचे सहाय्यक आयुक्त महादेव जगताप यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी मिटिंगमध्ये असल्याचे स्पष्ट करीत प्रतिक्रिया देण्याचे टाळले. पावसाळ्यात या रस्त्यावरून रिक्षा आणि गाड्याची कसरत खड्ड्यांमुळे करावी लागते. तर उन्हाळ्यात उडणाऱ्या धुळीने स्थानिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

पीएमसी बँक घोटाळा

आरबीआयला प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे हायकोर्टाचे आदेश

प्रतिनिधी

मुंबई, सोमवार – पंजाब आणि महाराष्ट्र बँक घोटाळ्याप्रकरणी खातेदारांचे होणारे नुकसान पाहता त्यांना दिलासा देण्यासाठी आतापर्यंत कोणती पावले उचललीत, असा सवाल उच्च न्यायालयाने आज केला.

न्यायमूर्ती सत्यरंजन धर्माधिकारी आणि न्यायमूर्ती रियाज छागला यांच्या खंडपीठाने रिझर्व्ह बँकेच्या निर्णयात आम्ही हस्तक्षेप करणार नाही. मात्र त्यांनी खातेदारांच्या हिताच्या दृष्टीने कोणती पावले उचलली आहेत का ते पहावे लागेल. आरबीआयने एका आठवड्यात प्रतिज्ञापत्र सादर करावे . त्यांनी समाधानकारक प्रतिज्ञापत्र सादर केले. तर या प्रकरणात हस्तक्षेप करणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. तसेच, याचिकेची सुनावणी १९ नोव्हेंबरपर्यंत तहकूब ठेवली. तूर्त खातेदारांना दिलासा देण्यास न्यायालयाने नकार दिला.

आरबीआयने घातलेल्या निर्बंधांमुळे पंजाब आणि महाराष्ट्र बँकेतील (पीएमसी) खातेदारांना आपल्या खात्यातून रक्कम काढण्यात अनेक अडचणी येत आहेत. याशिवाय पीएनबी बँकेच्या घोटाळ्यामुळे आतापर्यंत चार खाते दारांचा मृत्यू झाला आहे. आरबीआयने पीएनबी बँकेवर घातलेले निर्बंध हटवावेत. तसेच ग्राहकांना आपल्या खात्यातून जास्तीत जास्त रक्कम काढण्याची मुभा देण्यात यावी अशी मागणी करत प्राजक्ता वायकर यांच्यावतीने तमसीन मोनिस यांनी तर कन्झूमर अॅक्शन नेटवर्क, हरेश रायसिंगानी यांच्यासह तीन आणि एक जनहित याचिका उच्च न्यायालयात दाखल झाल्या आहेत . त्या याचिकांवर न्यायमूर्ती सत्यरंजन धर्माधिकारी आणि न्यायमूर्ती रियाज छागला यांच्या खंडपीठासमोर आज झाली. यावेळी न्यायालयाने दखल घेत शिखर बँक असलेल्या आरबीआयने खातेदारांच्या हिताच्या दृष्टीने या प्रकरणी नेमकी काय पावले उचलणार आहे हे आम्हाला जाणून घ्यायचे आहे.. आरबीआयच्या निर्णयात हस्तक्षेप करण्याचा अथवा त्यांचे अधिकारही कमी करायचे नाहीत. परंतु या प्रकरणाबाबत आरबीआयचे नेमके काय सुरू आहे हे समजावे म्हणून आठवडाभरात आरबीआयला प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश देत याचिकेची सुनावणी १९ नोव्हेबरपर्यंत तहकूब ठेवली.

न्यायालयात याचिका दाखल केल्याने न्यायालय लक्ष घालेल आणि एखादा आदेश याचिकदारांच्या बाजूने द्यायला आम्ही काही किमयागार नाही. याचिकाकर्त्यांना खोटी आश्वासने देऊ नका असे खडेबोल याचिकाकर्त्यांना सुनावताना खंडपीठाने आरबीआयने खातेदारांच्या हिताच्या दृष्टीने या प्रकरणी नेमकी काय पावले उचलणार आहे हे आमहाला जाणून घ्यायचे आहे. त्यांनी समादानकारक उत्तर दिले तर आम्ही त्यात हस्तक्षेप करणार नाही, असेही न्यायालयाने बोलून दाखविले.

ख्रिस्ती समाजाने चारशे वर्षांपासून मराठीसाठी दिलेल्या योगदानाची महाराष्ट्राने दिली पावती

वार्ताहर

वसई, दि. ४ – चारशे वर्षांपूर्वी वसई आणि गोव्यात राहून गेलेल्या फा. थॉमस स्टीफन्स या ख्रिस्ती मिशनऱ्याने 'ख्रिस्तपुराण' सारखा ग्रंथ लिहून मराठीची सेवा केली. मी काजवा आहे, माझ्या परीने चमकत आलो. पर्यावरण, माणूस, माती आणि मातृभाषेवर प्रेम करीत आलो. पटले ते लिहीत आलो आणि तसेच जगायचा प्रामाणिक प्रयत्न राहिला. अ. भा. मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी झालेली निवड ही ख्रिस्तीसमाज चारशे वर्षांपासून मराठीसाठी देत आलेल्या योगदानाची महाराष्ट्राने दिलेली पावती आहे, असे भावपूर्ण उद्गार अ. भा. साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष फा. फ्रान्सिस दिब्रिटो यांनी रविवारी सायंकाळी काढले.

अ. भा. साहित्य संमेलनाचे नियोजित अध्यक्ष फा. दिब्रिटो यांचे प्रतिपादन



अ. भा. साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल फा. दिब्रिटो यांचा सर्व साहित्यप्रेमींच्या वतीने प्रबोधन प्रतिष्ठानतर्फे नंदाखाल येथे नागरी सत्कार करण्यात आला. त्या सत्कारास उत्तर देताना फा. दिब्रिटो बोलत होते. आर्चबिशप डॉ फेलिक्स मच्याडो कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी, तर प्रमुख अतिथी म्हणून गिरीष कुबेर आणि पुणे धर्मप्रांताचे बिशप डॉ थॉमस डाबरे, वनाधिपती विनायक पाटील, बॅसिन कॅथॉलिक बँकेचे अध्यक्ष रायन फर्नांडीस व साहित्यिका डॉ अनुपमा उजगरे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होत्या. स्व. फा. डॉमनिक डीआब्रीओ यांनी आपणास लिहिते करून, संपादक म्हणून घडविले तर जर्मन धर्मगुरू लेदरले यांनी लेखनासाठी सतत प्रेरित केले. कार्डिनल सायमन पिमेन्टा यांनी आपल्या सामाजिक कार्याला प्रोत्साहन देऊन नेहमी मदत केल्याबद्दल या तिघांची फा. दिब्रिटो यांनी कृतज्ञता व्यक्त केली. वसईत विविध जाती, धर्माचे लोक एकत्र येऊन आम्ही परस्परांच्या सुख–दुःखात रममाण होतो. वसई सर्वधर्म मैत्रीची प्रयोगशाळा असून, देशांत अन्यत्र असे उदाहरण नसेल. शत्रूवरही प्रेम करता आलं पाहिजे. मी कुणाला शत्रू मानत नाही, कुणी मला शत्रू समजत असेल तर तो त्यांचा प्रश्न आहे, असेही फा. दिब्रिटो यावेळी म्हणाले.

खरा धर्म आचरणात आणला तर जगात धर्मच उरणार नाही, असे सांगून वनाधिपती विनायक पाटील यावेळी म्हणाले की, फा. दिब्रिटो यांच्या अध्यक्षीय नेमणुकीवरून उगारण्यात आलेले वाद निरर्थक होते. त्यांच्या धर्मगुरू असण्याहून नव्हे, तर केलेल्या लिखाणावर चर्चा व्हायला हरकत नव्हती. ज्ञानोबांची गीता ज्ञानेश्वरी द्वारे सुलभ केली. तर फा.दिब्रिटो यांनी बायबल कालसुसंगत करून 'सुबोध बायबल'ची निर्मिती केली.

पुणे धर्मप्रांताचे बिशप डॉ थॉमस डाबरे यावेळी म्हणाले की, फा. दिब्रिटो महाराष्ट्रातील ख्रिस्तधर्मियांचे आयकॉन असून, त्यांच्या लेखनावर येशू आणि बायबलचा प्रभाव आहे. प्रभू येशू राष्ट्रनिष्ठ होता. ख्रिस्ताची प्रेरणा म्हणजेच भारताच्या एकनिष्ठेची प्रेरणा होय. ख्रिस्त धर्माला कोणतीही संस्कृती अस्पृश्य नाही. आम्ही सर्वप्रथम आणि अखेरचे सुद्धा भारतीय आहोत.

वसईचे आर्चबिशप डॉ फेलिक्स मच्याडो अध्यक्षीय भाषणात म्हणाले, कॅथोलीकस म्हणजे वैश्विक. फा. दिब्रिटो यांचे पाय मातीत असले तरी त्यांचे विचार, लेखन आणि कृती वैश्विक असून ते विवेकाला जगणारे, तसेच आंतरिक स्वतंत्रप्रिय माणूस आहेत. सर्वांचे हित बघत, सर्वांना सोबत घेऊन जाणारे फा. दिब्रिटो हे एक संदेष्टे आहेत.परमेश्वराला एकनिष्ठ राहून खरे सांगणे ही संदेष्ट्याची जबाबदारीही ते प्रामाणिकपणे पार पाडीत आले असल्याचे त्यांनी सांगितले.

रोह्यात १७ नोव्हेंबर रोजी जिल्हास्तरीय 'वैद्यकीय' मॅरेथॉन

वार्ताहर

अलिबाग, दि. ४ – रायगड जिल्ह्यातील डॉक्टरांची सक्रीय संघटना असलेल्या रायगड मेडीकल असोसिएशनची पहिली जिल्हास्तरीय मॅरेथॉन येत्या १७ नोव्हेंबर रोजी रोह्यात होणार असून या साठी जय्यत तयारी सुरू आहे.

नोव्हेंबर महिन्यात थंडीची सुखद चाहूल लागलेली असते त्यामुळे वातावरण आल्हाददायक असते त्यातच निसर्ग धुक्याची शाल पांघरून घेत असल्यामुळे निसर्ग सौंदर्याने नटलेल्या परिसरात होणाऱ्या या मॅरेथॉन मध्ये सहभागी होण्याचा एक विलक्षण आनंद सहभागी स्पर्धकांना मिळणार आह . रोह्याच्या निसर्गसुंदर अशा डोंगराळ भागात हा इव्हेंट होत असल्यामुळे या मॅरेथॉनबद्दल जिल्ह्यातील डॉक्टरांमध्ये कमालीची उत्सुकता आहे.

रोह्यात अनेक उपक्रमांचे यशस्वी नियोजन करणाऱ्या रोटरी क्लब रोहा सेंट्रल कडे या इवेंटचे पूर्ण नियोजन असुन त्यांनी या उपक्रमासाठी विशेष नियोजन केले आहे. रायगड मेडीकल असोसिएशन तर्फे प्रेसिडेंट डॉ .देवेंद्र जाधव यांच्या नेतृत्वाखाली व मॅरेथॉनचे चेयरमन जिल्ह्यातील सुप्रसिद्ध हृदयरोगचिकित्सक डॉ. अशोक जाधव यांच्या पुढाकाराने व सर्व आर.एम.ए. सदस्यांच्या विशेष सहकार्याने हा उपक्रम होत आहे. जिल्हा केमिस्ट असोसिएशन, एम.आर. असोसिएशन, लॅब असोसिएशन या वैद्यकिय क्षेत्राशी संबंधित घटकांनाही या मॅरेथॉन मध्ये सहभाग घेण्याची संधी देण्यात येणार आहे. तसेच हा उपक्रम रोहा येथे होत असल्यामुळे रोह्यातील प्रथम नोंदणी करणाऱ्या काही ठराविक हौशी धावपटूंना या मॅरेथॉन मध्ये सहभागी होण्याची संधी देण्यात आलेली आहे.

epaper.freepressjournal.in

'सी' अर्ज (सी फॉर्म्स) हरवले

सेंट्रल सेल्सटॅक्स डिपार्टमेंटने दिलेले 'सी' अर्ज (सी फॉर्म्स) हरवलेले आहेत. त्याचा तपशील खाली दिलेला आहे. कोणालाही सदर 'सी' अर्ज (सी फॉर्म्स) सापडल्यास खाली दिलेल्या पत्त्यावर संपर्क साधावा अथवा कृपया खालील पत्त्यावर परत करावा.

'सी' अर्ज (सी फॉर्म्स) तपशील

मे. म्युच्युअल इंडस्ट्रिज लि., सिल्व्हासाद्वारे जारी केलेले तारीख ०२.१२.०६ चे क्र. ०३६७५११, ०३६७५१२, ०३६७६१५.

मे. टाटा मोटर्स लि. लखनौ द्वारा जारी केलेले क्र. ७४८०३७ तारीख २५.०८.०६, ०७४९०५३ तारीख ५.१०.०६, ०७४९९८५ तारीख १३.११.०६, २७ ०६४१८६२ तारीख २०.०२.०७.

मे. एशिया मोटर वर्क्स लि., भूज द्वारा जारी केलेले क्र. ३६९१४६१ तारीख ३०.०६.०६, ४७५३६२२ तारीख ७.१२.०६, ५६९६०६० तारीख २९.१२.०७.

मे. टाटा मोटर्स लि., बंगलोरद्वारा जारी केलेले क्र. १४४८५०६, १४४८५०७, १४४८५०८, १४४८५०९ तारीख १४.०७.०६.

टाटा मोटर्स लि.मि., जमशेदपूर द्वारा जारी केलेले क्र. ०२४७८५३ तारीख ०४.०९.०६, ०२५५४९२ तारीख ५.१०.०६, ०४०८२७० तारीख २८.०९.०७.

पत्ताः मेसर्स कोठारी एन्टरप्रायजेस
ए/३५, विरवानी इंडस्ट्रियल इस्टेट,
वेस्टर्न एक्सप्रेस हायवेसमोर,
गोरेगाव (पूर्व), मुंबई–४०० ०६३.
दूरध्वनी: ०२२–२९२७ १३३५/२९२७ १२९८/ २९२७ १२९९.

जाहीर सूचना

सूचना घ्यावी की, आमचे अशील हे श्री. जगदीश जगजीवन जेठवा (मालक) पत्ता : १७०४, ग्रीन एकर्स फेज–३, बिल्डिंग क्र. ०२, जी. बी. रोड, वाघबीळ, ठाणे (पश्चिम), ठाणे–४०० ६१५ यांच्याकडून स्पष्ट आणि पणनयोग्य हक्कांसह सर्व बोजांनी मुक्त खालील नमूद मिळकतीचे विकास हक्क खरेदी करण्यासाठी बोलणी करीत आहेत. मालकांनी कळविले आहे की, सदर मिळकतीचे सहा मूळ हक्क दस्तावेज म्हणजे (१) २.०३.१९६२ रोजीचे अभिहस्तांतरण पत्र (नोंदणीकरण क्र. बीओएम/९३३/ १९६२), (२) १०.०८.१९६५ चे अभिहस्तांतरण पत्र (नोंदणीकरण क्र. बीओएम/२७६९/१९६५), (३) ०६.०८.१९६५ रोजीचे प्रतिज्ञापत्र (नोंदणीकरण क्र. बीओएम/ २७७०/ १९६५), (४) ११.०८.१९६५ रोजीचे अभिहस्तांकन, (५) १६.१०.१९९५ रोजीचे अभिहस्तांतरण पत्र (नोंदणीकरण क्र. बीबीई/३०२९/१९९५) आणि (६) २२.१०.१९९७ रोजीचे अभिहस्तांतरण पत्र (नोंदणीकरण क्र. बीबीई/३७०८/१९९७), हे सर्व गहाळ झाले/हरवले आहेत आणि ते सापडण्याजोगे नाहीत आणि की ते कोणतेही कर्ज वा अन्यकरिता गहाण म्हणून कोणाकडेही ठेवलेले नाहीत.

सर्व व्यक्तींना सदर मिळकतीच्या विकास नि विक्रीच्या मंजुरीसापेक्ष वा त्याला कोणतीही हरकत असल्यास आणि/वा सदर मिळकत वा त्याचा कोणताही भाग यावर, विरुद्ध वा त्यामध्ये वारसा, गहाण, कुळवहिवाट, धारणाधिकार, प्रभार, न्यास, देखभाल, विकास हक्क, सुविधाधिकार वा अन्य जे जे काही असेल त्याद्वारे कोणताही अधिकार, हक्क, हितसंबंध, दावा वा मागणी असल्यास याद्वारे त्याबाबत लेखी स्वरुपात कागदोपत्री पुराव्यांसह निम्नस्वाक्षरीकारांना त्यांचे कार्यालय **३०१, इंडिया प्रिंटिंग हाऊस, ४२, जी. डी. आंबेकर मार्ग, राम मंदिरासमोर, वडाळा, मुंबई–४०० ०३१** येथे या तारखेपासून १४ दिवसांच्या आत कळविणे आवश्यक आहे, कसूर केल्यास असा दावा वा हरकत विचारात न घेता व्यवहार पूर्ण करण्यात येईल आणि जर तो असल्यास, सोडून दिला आणि/वा त्यागित केला आहे असे समजले जाईल.

मिळकत वर्णन

माहिम विभाग, जिल्हा मुंबई शहरचा सी. एस. क्र. १८३, टी. पी. एस. IV माहिम विभागाचा अंतिम प्लॉट क्र. ७६५–ए (१ ला बदल) (अंतिम) धारक मोजमपित सुमारे ४२६.४२ चौ. मीटर्स जमीन यासह कॉलेज लेन, गोखले रोड, दादर (पश्चिम), मुंबई–४०० ०२२ येथे स्थित त्यावर उभी असलेली ''जगमणी निवास'' या अगोदर ''शाह मेन्शन'' म्हणून ज्ञात बिल्डिंग.

सही/– १२.१०.२०१०
मनोज देढिया
मनोज अँण्ड अशोक असोसिएटस्
ॲडव्होकेटस् अँण्ड सॉलिसिटर्स

जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, भानुमती पद्मनाभन आणि जगदीश पद्मनभन (अर्जदार) यांचे नावे असलेली फायझर लि. द्वारे जारी केलेले शेअर धारक विभिन्न क्र. ००१७८९०७९१ ते ००१७८९०८४०, फोलियो क्र. पीझेडपी पी००८९७०१–९ करिता ५० शेअर्स करिता शेअर प्रमाणपत्र क्र. ००३२३४४४ गहाळ/हरविले. अर्जदारांनी दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१९ रोजी तक्रार क्र. ८०५२/१९ द्वारे मुलुंड (पश्चिम) पोलिस स्टेशन सह हरविलेले तक्रार दाखल केला आहे आणि कंपनीकडे प्रतिलिपी शेअर प्रमाणपत्र जारी करण्याकरिता अर्ज केला आहे.

कोणत्याही व्यक्तीस/क्तींना सदर शेअर्सवर दावा असल्यास असे दावे कंपनीचे निबंधक आणि हस्तांतर ऐंजट मे. कार्व्ही फिनटेक प्रा. लि., कार्व्ही सिलेनियम, टॉवर बी, प्लॉट क्र. ३१, ३२, गच्छी बौली, फायनान्शियल डिस्ट्रीक्ट, नानाक्रमगुडा, हेद्राबाद–५०० ०३२ येथे सूचनेच्या दिनांकापासून १५ दिवसांत दाखल करावे, कसूर केल्यास कंपनी सदर शेअर्सच्या संबंधित प्रतिलिपी शेअर प्रमाणपत्र जारी करतील.

भानुमती पद्मानाभन आणि
जगदिश पद्मनाभन
(अर्जदार)
मुंबई, ४.११.२०१९

इंट्रासॉफ्ट टेक्नॉलॉजीस् लिमिटेड

सीआयएन : एल२४१३३एमएच१९९६पीएलसी१९७८५७
नोंद. कार्यालय : ५०२ ए, प्रथमेश, रघुवंशी मिल्स कंपाऊंड, सेनापती बापट मार्ग, लोअर परेल, मुंबई ४०० ०१३. **टेलि. :** + ९१ २२ २४९१ २१२३, **फॅक्स :** + ९१–२२–२४९०३१२३
ईमेल : intrasoft@ittlindia.com, **वेबसाईट :** www.ittlindia.com

सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ४७ च्या अन्वये कंपनीच्या संचालक मंडळाची सभा अलेखापरिक्षित अलिप्त आणि एकत्रित वित्तीय निष्कर्ष इतर बाबींसह विचारात आणि मंजूरीकरिता दिनांक **३० सप्टेंबर, २०१९** रोजीस संपलेल्या तिमाही आणि अर्धा वर्षा करिता **मंगळवार, नोव्हेंबर १२, २०१९** रोजी घेण्यात येणार आहे.

सूचना कंपनीचे संकेतस्थळ म्हणजेच **www.itlindia.com** आणि बॉम्बे स्टॉक एक्सचेंज लिमिटेडचे संकेतस्थळ **www.nseindia.com** आणि **www.bseindia.com** यावरही उपलब्ध असणार आहे.

इंट्रासॉफ्ट टेक्नॉलॉजीस् लिमिटेड
सही/–
प्रणवेश त्रिपाठी
स्थळ : मुंबई **कंपनी सचिव आणि**
दिनांक : ०४.११.२०१९ **अनुपालन अधिकारी**

सकुमा एक्सपोर्ट्स लि.

एक्सपोर्ट्स अँड इम्पोर्टर्स
(भारत सरकार मान्यताप्राप्त ट्रेडिंग हाऊस)

नोंद. कार्या : ३०१–ए, औरस चेंबर्स, एस. एस. अमृतवार लेन, महिंद्रा टॉवर जवळ, वरळी, मुंबई – ४०००१३
सीआयएन : एल५१९०९एमएच२००५ पीएलसी१५५७६५)

सूचना

स्टॉक एक्सचेंजसह सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अॅन्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ४७ ला अनुसरून याद्वारे सूचना देण्यात येते की, सकुमा एक्सपोर्ट्स लि. च्या संचालक मंडळाची सभा दिनांक ३० सप्टेंबर, २०१९ रोजी संपलेल्या तिमाहीकरिता कंपनीच्या अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्षांना विचारात, मंजूर आणि पटलावर घेण्यासाठी कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय ३०१–ए, औरस चेंबर्स, एस.एस. अमृतवार लेन, महिंद्र टॉवरजवळ, वरळी, मुंबई–४०० ०१३ येथे **गुरुवार, १४ नोव्हेंबर, २०१९ रोजी स. ११.०० वा** घेण्यात येणार आहे.

सकुमा एक्सपोर्ट्स लिमिटेड करिता
सही/–
सौरभ मल्होत्रा
(अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक)
ठिकाण : मुंबई
दिनांक : ०५ नोव्हेंबर, २०१९

जाहीर सूचना

याद्वारे सर्व जनतेला सूचना देण्यात येते की, सोसायटीच्या नोंदीनुसार एक श्री. प्रमोद के. गोएंका राहणार फ्लॅट क्र. ६०१, वैभव कुटीर सीएचएस, जुहू तारा रोड, मुंबई–४०० ०४९ हे सर्व २८ मार्च, २००८ रोजीच्या तीन नोंदणीकृत विलेखाद्वारे अनुक्रमे शॉप क्र. १, २ आणि ३ तळमजला, अशोका शॉपिंग सेंटर, एल. टी. मार्ग, मुंबई– ४०० ००१ (येथे एकत्रितपणे ''सदर वास्तू परिसर'' म्हणून उल्लेख) च्या खरेदीमुळे सोसायटीचे सभासद आहेत. संबंधित सभासदाने सदर ३ वास्तू परिसर एक्सिस बँककडे तात्पुरत्या तत्वावर अनुज्ञप्ती/भाडेपट्टा करारांतर्गत भाड्याने दिला आहे.

तथापि, वरील नावाचा सभासद कोठेही सापडत नाही आणि/वा त्याचा ठावठिकाण माहित नाही आणि सभासदांचा सोसायटीसह कोणत्याही स्वरूपाचा संपर्क नाही. काही नितीभ्रष्ट आणि तोतये कायदेशीर वारस आणि कुटुंब सदस्य असल्याचा दावा करीत सोसायटी परिसराला भेट देत असल्यामुळे सोसायटीने यापूर्वी जाहीर सूचना दिली आणि जनतेला अशा व्यक्तिसह व्यवहार वा संबंध न ठेवण्याबाबत आणि सोसायटीला कळविण्याबाबत सावध करण्यात आले. कोणत्याही कायदेशीर वारसाने आजच्या तारखेपर्यंत सोसायटीकडे संपर्क साधलेला नाही.

वास्तू परिसर सुरक्षित आणि संरक्षित करण्यासाठी जनतेच्या संबंधित सदस्यांना याद्वारे जनतेच्या संबंधित सदस्यांना याद्वारे सदर शॉप्ससह व्यवहार न करण्यासाठी सावध करण्यात येत आहे आणि नोंद घ्यावी की, सोसायटी कोणतीही पुढील सूचना न देता सदर शॉप्स् सुरक्षित करण्यासाठी योग्य कृती करील आणि ताबा आणि कब्जा घेईल.

दिनांक ५ नोव्हेंबर, २०१९
मानद सचिव,
अशोका शॉपिंग सेंटर प्रिमायसेस को–ऑप. सोसायटी लि.

सफारी इंडस्ट्रीज (इंडिया) लि.

नोंदणीकृत कार्यालयः ३०२–३०३, ए विंग, दि क्युब, सीटीएस क्र. १४९८, ए/२, एम.व्ही. रोड, मरोळ, अंधेरी (पू.), मुंबई–४०० ०५९ (फो.) +९१ २२ ४०३८१८८८; (फॅ.) +९१ २२ ४०३८१८५०, ईमेल आयडीः investor@safari.in वेबसाईटः www.safaribags.com
सीआयएनः एल२५२००एमएच१९८०पीएलसी०२२८१२

सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अॅण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स २०१५ च्या रेग्युलेशन २९ सहवाचता रेग्युलेशन ४७ अनुसार सूचना याद्वारे देण्यात येते की, कंपनीच्या संचालक मंडळाची सभा ही कंपनीच्या सांविधानिक लेखापरिक्षकाद्वारे मर्यादीत पुनर्विलोकनाधिन **३० सप्टेंबर, २०१९** रोजी संपलेली तिमाही आणि अर्धवर्ष करिता अलेखापरिक्षित अलिप्त आणि एकत्रित वित्तीय निष्कर्ष इतर बाबीसह विचारात आणि मंजूर करण्यासाठी सोमवार, ११ नोव्हेंबर २०१९ रोजी घेण्यात येणार आहे.

सदर सूचना कंपनीची वेबसाईट **www.safaribags.com** आणि बीएसइ लिमिटेडची वेबसाईट अनुक्रमे **www.bseindia.com** आणि **www.nseindia.com** वर सुद्धा उपलब्ध आहे.

सफारी इंडस्ट्रीज (इंडिया) लि. करिता
सही/–
सुधीर जतिया
अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक
ठिकाणः मुंबई
दिनांकः ४ नोव्हेंबर, २०१९

जाहीर सूचना

याद्वारे माझे अशील श्री. कार्तिक कोडावतीगांटी यांच्यावतीने सूचना देण्यात येते की, श्री. कार्तिक कोडावतीगांटी आणि त्याची पत्नी सौ. रुचिका वर्मा हे परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या आणि नोंदणीकरण जिल्हा मुंबईमधील मिठागर विभागाचा सी. एस. क्र. १०/११६ येथे स्थित मिळकतीचे संयुक्त मालक होते, माझ्या अशिलांची पत्नी म्हणजे सौ. रुचिका वर्मा यांचे दुःखद निधन झाल्यानंतर, सौ. रुचिका वर्मा यांचे कायदेशीर वारस म्हणून श्री. कार्तिक कोडावतीगांटी यांच्या नावे सदर मिळकत हस्तांतरित झाली होती, शेअर प्रमाणपत्रसुद्धा श्री. कार्तिक कोडावतीगांटी यांच्या नावे हस्तांतरित झाले, त्यापासून सदर परिशिष्टातील मिळकत माझ्या अशिलांनी धारण केली आहे आणि कायदेशीरपणे मालकीची आहे, जी सर्व बोजांपासून मुक्त आहे आणि त्यांनी सदर परिशिष्टातील मिळकत विकण्याचे ठरविले आहे. म्हणून कोणत्याही व्यक्तीला सदर परिशिष्टातील मिळकतीसंबंधी कोणताही अधिकार, हक्क, हितसंबंध, दावा वा कोणत्याही स्वरुपाची मागणी असल्यास त्याबाबत त्याच्या कागदोपत्री पुराव्यांसह लेखी स्वरुपात निम्नस्वाक्षरीकारांना या सूचनेच्या प्रसिद्धीच्या तारखेपासून १५ दिवसांत कळविणे आवश्यक आहे. कसूर केल्यास कोणत्याही अशा व्यक्तीचा दावा सोडून दिला आणि/वा त्यागित केला आहे असे मानले जाईल.

परिशिष्ट

नोंदणीकरण जिल्हा मुंबईमधील मिठागर विभागाच्या सी. एम. क्र. १०/११६ धारक जमिनीवर बांधलेल्या, मिठागर रोड, वडाळा (पूर्व), मुंबई–४०० ०३७ येथे स्थित लॉयडस् इस्टेट, वडाळा हाईटस् को–ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि., म्हणून ज्ञात बिल्डिंगच्या ९४.२४ चौ. मी. सु. बि. ए. शी समतुल्य ७५.४ चौ. मी. बिल्टअप एरियाशी समतुल्य मोजमापित ६२.८ चौ. मी. कार्पेट एरिया ''डी'' विंगमधील २३ व्या मजल्यावरील फ्लॅट क्र. २३०३ (फ्लॅट क्र. ०३), यासह स्टील्ट लेव्हलवरील एक बंदिस्त कार पार्किंग एरिया क्र. एस–१०

सही/–
ॲड. हर्षदा व्ही. शिंगणापूरकर
४०, अल्ली चेंबर्स, ३ रा मजला,
एन. एम. रोड, फोर्ट, मुंबई–२३
तारीख–०४/११/२०१९

ग्रॅण्ड फाऊंड्री लिमिटेड

सीआयएन : एल९९९९९एमएच१९७४पीएलसी०१७६५५
नोंदणी कार्यालय : ३२७, ३ रा मजला, अरूण चेंबर्स, ताडदेव, मुंबई – ४०००३४
फोन क्र. ०२२–२३५२६३१६, इमेल आयडीः cs@gfsteel.co.in; वेबसाईटः www.gfsteel.co.in

सूचना

सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अॅण्ड डिस्क्लोजर रिक्वारमेंटस्) रेग्युलेशन्स २०१५ च्या रेग्युलेशन २९ आणि ४७ अनुसार सूचना याद्वारे देण्यात येते की, कंपनीच्या संचालक मंडळाची सभा ही ३० सप्टेंबर २०१९ रोजी संपलेल्या तिमाही आणि अर्ध वर्षाकरिता कंपनीच्या अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष इतर बाबींसह विचारात, मंजुर आणि पप्लावर घेण्यासाठी बुधवार, १३ नोव्हेंबर, २०१९ रोजी घेण्यात येणार आहे.

सदर माहिती ही कंपनीचे शेअर्स सूचीबद्ध असलेल्या बीएसई लिमिटेडची वेबसाईट www.bseindia.com आणि नॅशनल स्टॉक एक्स्चेंजची वेबसाईट www.nseindia.com वर सुद्धा उपलब्ध आहे आणि कंपनीची वेबसाईट म्हणजेच www.gfsteel.co.in वर सुद्धा उपलब्ध आहे.

ग्रॅण्ड फाऊंड्री लिमिटेड करिता
सही/–
ठिकाण : मुंबई **किरण जागला**
दिनांक : ०४.११.२०१९ **व्यवस्थापकीय संचालक**

स्टेट बँक ऑफ इंडिया

स्ट्रेस्ड ॲसेटस् मॅनेजमेंट
शाखा– II, मुंबई
रहेजा चेंबर्स, तळ मजला, विंग–बी, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई–४०० ०२१.

शुद्धिपत्र

दिनांक २०.१०.२०१९ रोजी ह्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या कर्जदार **मे. विंध्यवासिनी स्टील प्रॉडक्टस् प्रा. लि.** करिता आमच्या ई–लिलाव विक्री सूचनेचा संदर्भ घ्यावा. कृपया **मागणी सूचना तारीख** ०४.१०.२०१९ च्या ऐवजी ०२.०७.२०१३ वाचावी.

प्राधिकृत अधिकारी,
स्टेट बँक ऑफ इंडिया
स्ट्रेस्ड ॲसेटस् मॅनेजमेंट शाखा–II

जाहीर सूचना

याद्वारे नागरिकांना मोठ्या प्रमाणावर सूचना देण्यात येते की, माझे अशील श्री. रमेश टी. रामचंदानी यांच्याकडून गुलमोहर क्रॉस रोड क्र. १२, प्लॉट क्र. २०, जुहू सकीम, मुंबई ४०००४९ येथे स्थित महादेव गव्हर्नमेंट इम्प्लॉईज को– ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि. नावे ज्ञात सोसायटीच्या इम्पिरिअल रेसिडन्सी नावे ज्ञात इमारतीमध्ये १० व्या मजल्यावर फ्लॅट क्र. १००१, मोजमापित ९४३ चौ.फू. चटई क्षेत्र खरेदी करण्यास इच्छुक आहेत.

कोणत्याही/सर्व व्यक्ती आणि/किंवा वित्तीय संस्था यांना खाली वर्णन केलेल्या फ्लॅटच्या संदर्भात विक्री, अदलाबदल, गहाण, प्रभार, भेट, विश्वस्त, कब्जा, वारसा, धारणाधिकार, सुविधाधिकार, अंत्यदान किंवा याशिवाय कसेहीच्या मार्गे कोणताही दावा अधिकार, नामाधिकार, फायदा आणि/किंवा हितसंबंध असल्यास लिखित स्वरूपात दाव्यांच्या पृष्ठ्यर्थ सर्व कागदपत्रांच्या नोटराईज्ड सत्य प्रतींसह वकील श्री. दिपेश जे सांचला, कार्यालय क्र. ११२–ए, १ ला मजला, सुपर मार्केट सीएचएसएल, मोंगीभाई रोड, विलेपार्ले पूर्व, मुंबई–४०० ०५७ येथे यांच्या कार्यालयात सदर प्रकाशनाच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या कालावधीत कळविणे, कसूर केल्यास असे सर्व दावे, अधिकार, नामाधिकार, फायदा आणि/किंवा हितसंबंध काही असल्यास कोणत्याही पुढील सूचनेशिवाय त्यागित आणि/किंवा परित्यागित करण्यात येतील.

मिळकतीचे परिशिष्ट

मुंबई उपनगर जिल्हयाच्या नोंदणीकृत जिल्हा आणि उपजिल्हयामध्ये गाव अंधेरी, तालुका अंधेरी धारक सर्व्हे क्र. १०६/ए, सीटीएस क्र. १९५/१७२ किंवा तत्समशी संलग्न येथे स्थित असलेले आणि वसलेले जमिनीच्या सदर प्लॉट आणि गुलमोहर क्रॉस रोड क्र. १२, प्लॉट क्र. २०, जुहू स्कीम, मुंबई–४०००४९ येथे स्थित महादेव गव्हर्नमेंट इम्प्लॉईज को– ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लि. नावे ज्ञात सोसायटीच्या इम्पिरिअल रेसिडन्सी नावे ज्ञात इमारतीमध्ये १० व्या मजल्यावर फ्लॅट क्र. १००१, मोजमापित ९४३ चौ.फू. चटई क्षेत्र चे वर्णन.

सही/– दिपेश जे. सांचला (वकील)
दिनांक: ५ नोव्हेंबर, २०१९

SPENTA INTERNATIONAL LIMITED

CIN NO: L28129MH1986PLC040482
Regd. Off: Plot Nos. 13, 14, 15 & 16, Dewan Industrial Estate, Village Navali Palghar (W), 401 404.
Web: www.spentasocks.com **Tel No:** 91-(2525)-254932 **Fax:** 02525-254932 **Ext:** 113.

NOTICE

Notice is hereby given that pursuant to regulation 29 read with Regulation 47 of the SEBI (Listing Obligation and Disclosure Requirements) Regulations, 2015 Meeting of the Board of Directors of the Company will be held on Thursday, 7th November, 2019 at the registered office of the Company situated at Plot No. 13 to 16, 40 (Part) & 40/2, Dewan Industrial Estate, Village Navali, District Thane, Palghar (West) – 401 404 to consider, approve and take on record the Standalone Un-Audited Financial Results along with Limited Review Report for the quarter and half-year ended 30th September, 2019.

By order of the Board.
For **SPENTA INTERNATIONAL LTD.**
Danny Hansotia
Place: Palghar Managing Director Cum CFO
Date: 5th November, 2019 DIN-00203497

डी बी रिअॅल्टी लिमिटेड

सीआयएनः एल७०२००एमएच२००७पीएलसी१६६८१८
नोंदणी कार्या.: डीबी हाऊस, जन. ए. के. वैद्य मार्ग, गोरेगाव (पूर्व), मुंबई–४०० ०६३
दूर.: ९१–२२–४०७७ ८६०० **फॅक्स क्र.:** ९१–२२–२८४१ ५५५०/२८४२ १६६७
ई–मेलः investors@dbg.co.in **वेबसाईटः** www.dbrealty.co.in

सूचना

सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अॅण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्),रेग्युलेशन्स २०१५ च्या रेग्युलेशन्स २९ आणि ४७ अन्वये याव्दारे सूचना देण्यात येते की, कंपनीच्या संचालक मंडळाची सभा दिनांक ३० सप्टेंबर, २०१९ रोजी संपलेल्या दुसऱ्या तिमाही आणि अर्धवर्षाकरिता कंपनीच्या अलेखापरिक्षित वित्तीय विवरण इतर बाबींसह विचारात आणि पटलावर घेण्यासाठी गुरुवार, १४ नोव्हेंबर, २०१९ रोजी कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात घेण्यात येणार आहे.

सदर सूचना कंपनीचे संकेतस्थळ www.dbrealty.co.in आणि बीएसई लिमिटेडचे (http://www.bseindia.com) व नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेडचे (http://www.nseindia.com) या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

डी बी रिअॅल्टी लिमिटेडकरिता
ठिकाणः मुंबई जिग्नेश शाह
दिनांकः नोव्हेंबर ४, २०१९ कंपनी सचिव

पोलो क्वीन इंडस्ट्रीयल अँड फिनटेक लिमिटेड

(सीआयएनः एल७२२००एमएच१९८४पीएलसी०९४५३९)
नोंदणीकृत कार्यालयः ३०४, ए टू झेड इंडस्ट्रीयल प्रिमायसेस, जी. के. मार्ग, लोअर परळ (प.), मुंबई–४०० ०१३ **दूर.:** ०२२–२४९३५४२१/२४८१७००१, **फॅक्सः** ०२२ २४९३५४२०/२४८१७०४७
ईमेलः info@poloqueen.com **वेबसाईटः** www.poloqueen.com

सूचना

सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ४७ सहवाचता रेग्युलेशन २९ ला अनुसरून याद्वारे सूचना देण्यात येते की, कंपनीच्या संचालक मंडळाची सभा हि ३० सप्टेंबर २०१९ रोजी संपलेली तिमाही/अर्ध वर्षासाठी कंपनीचा अलिप्त आणि एकत्रित अलेखापरिक्षित वित्तीय निष्कर्ष इतर बाबींसह विचारात घेऊन पटलावर घेण्याकरिता सोमवार, ११ नोव्हेंबर, २०१९ रोजी दु. ४.०० वा. कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात घेण्याचे नियोजित आहे.

सदर सूचना कंपनीची वेबसाईट www.poloqueen.com वर आणि कंपनीचे शेअर्स जेथे सूचीबद्ध आहेत त्या स्टॉक एक्सचेंजसच्या वेबसाईट म्हणजेच बीएसई लिमिटेडची www.bseindia.com आणि मेट्रोपॉलिटन स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडची www.msei.in वर पाहता येईल.

पोलो क्वीन इंडस्ट्रीयल अँड फिनटेक लिमिटेडकरिता
सही/–
ठिकाण : मुंबई **उदित पी संघाई**
दिनांक : ४ नोव्हेंबर, २०१९ **कार्यकारी संचालक आणि सीएफओ**

ॲस्पायर होम फायनान्स कॉर्पोरेशन लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : मोतीलाल ओसवाल टॉवर, रहिमतुल्लाह सयानी रोड, एसटी डेपोसमोर, प्रभादेवी, मुंबई –४०० ०२५. **ईमेल :** info@ahfcl.com **सीआयएन :** यु६५९२३एमएच२०१३पीएलसी२४८७४१

मागणी सूचना

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ च्या कलम १३(२) अन्वये सूचना

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (सदर अधिनियम) चे कलम १३(२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ (सदर नियम) च्या नियम ३ (१) अंतर्गत, सदर ॲक्टच्या कलम १३(१२) सहवाचता सदर रुलच्या नियम ३ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून, प्राधिकृत अधिकाऱ्यांनी सदर ॲक्टच्या कलम १३(२) अन्वये मागणी सूचना जारी करून कर्जदार/सह–कर्जदार/जामीनदार यांना त्यांना जारी केलेल्या संबंधित मागणी सूचनेत नमूद केलेल्या कर्ज रकमेची परतफेड करण्यास सांगितले. वरील संबंधात सर्व पक्षकारांना याद्वारे पुन्हा एकदा सूचना देण्यात येते की, ह्या सूचनेच्या प्रसिद्धीपासून ६० दिवसांत येथे खाली नमूद केलेल्या रकमा, मागणी सूचनेच्या तारखे (खां) पासून प्रदानाच्या तारखेपर्यंत पुढील व्याजासह एकत्रितपणे प्रदान कराव्यात. कर्जदार, मागणी सूचनेच्या तारखेस थकीत रक्कम आणि कर्ज रकमेच्या परतफेडीप्रती देऊ केलेल्या तारण यांचे तपशील खालीलप्रमाणे :

कर्ज करार क्र./कर्जदार/सहकर्जदार/ हामीदारांचे नाव	मागणी सूचनेची तारीख आणि रक्कम	तारणमत्तांचे वर्णन (स्थावर मिळकत/ती)
एलएक्सपीइएन००११६–१७००४३१५४ / अब्दुल एच खान / शबाना अब्दुल खान	२२–०६–२०१८ / रु. १५४७४०९/– (रुपये पंधरा लाख सत्तेचाळीस हजार चारशे नऊ मात्र)	फ्लॅट क्र. ००५ डी विंग वर्डर कॉम्प्लेक्स, स. क्र. २४१, हि. क्र. १, टाऊन प्लॅनिंग क्र. १०४/१६, कोन, सेरेमनी बँनक्वेट हॉल जवळ, ता. भिवंडी ठाणे ४२१३०२ महाराष्ट्र भारत
एलएक्सपीएन००११६–१७०००४८४६३ / डॉली अखिलेश कुमार झा / अखिलेश कुमार किशोर झा	२६–०९–२०१९ / रु. १६७६३७५/– (रुपये सोळा लाख शह्यात्तर हजार तीनशे पंच्याहत्तर मात्र)	सी – १/१३, ३ रा मजला, कुडुस बस स्टॉप प्रगती नगर, पालघर, ठाणे, महाराष्ट्र (भारत) – ४००६०१
एलएक्सव्हीआयआर००२१५–१६००१९६६८ / नेबुलाल दयाराम / फरिदाबानो भोला शेख	२६–०९–२०१९ / रु. १०१११३७/– (रुपये दहा लाख अकरा हजार एकशे सदोत्तीस मात्र)	फ्लॅट क्र. ३०२, मजला ३ रा, साई दिशा कॉम्प्लेक्स, गट क्र. ३६८/७, वाडा, मस्जिद कुडुस, ठाणे, महाराष्ट्र –४२१३१२
एलएक्सव्हीआयआर००३१५–१६००१४५५२ / कल्पना मधुकर धोत्रे / कैलाश मधुकर धोत्रे	२६–०९–२०१९ / रु. ११४९०५८/– (रुपये अकरा लाख एकोणपन्नास हजार अठ्ठावन्न मात्र)	फ्लॅट क्र. ए–२०६, २ रा मजला, ए विंग, अन्नपूर्णा दर्शन, चर्च जवळ, डोंबिवली पूर्व, ठाणे, महाराष्ट्र – ४२१२०१
एलएक्सकेएएल००३१५–१६०००३९२६ / निरव छगनभाई पटेल / दक्षाबेन छगनभाई भदानी	२६–०९–२०१९ / रु. ११४३९५७/– (रुपये अकरा लाख त्रेचाळीस हजार नऊशे सत्तावन्न मात्र)	फ्लॅट क्र. १०२, १ ला मजला, बी–विंग, चंदिका पार्क, इंडो गारमेंट कंपनी बाजुला स. क्र. १३२, हिस्सा क्र. ८ चंद्रपाडा, पालघर, महाराष्ट्र – ४०१२०७
एलएक्सकेएएल००३१६–१७००२९८७४ / श्रीनिवास शैलु कालकुरी / सुजाता श्रीनिवास कालकुरी	२६–०९–२०१९ / रु. १९७८४८५/– (रुपये एकोणीस लाख अठ्ठ्याहत्तर हजार चारशे पंच्याऐंशी मात्र)	फ्लॅट क्र. २०१, २ रा मजला, सोहम अपार्ट., गट क्र. १५२, स. क्र. ५५, प्लॉट क्र. ०३, एच. पी. पेट्रोल पंप जवळ, वांगणी, ठाणे, महाराष्ट्र – ४२१२०१
एलएक्सकेआर००११५–१६००१८८४२ / रोहित विनोदशंकर चौबे / रिशु विनोदशंकर चौबे	२६–०९–२०१९ / रु. १८८७७४०/– (रुपये अठरा लाख सत्याऐंशी हजार सातशे चाळीस मात्र)	फ्लॅट क्र. १०४, १ ला मजला, बी विंग, वैष्णवी अपार्टमेंट, गाव चिंचपाडा स. क्र. १, हि. क्र. ५, नवरत्न रेसिडेन्सी, कल्याण, ठाणे, महाराष्ट्र – ४२१३०६
एलएक्सपीएल००२१६–१७००३३२२२ / विश्वजित रमेश उपाध्याय / प्रिती उपाध्याय	२६–०९–२०१९ / रु. ८१०१०४/– (रुपये आठ लाख दहा हजार एकशे चार मात्र)	फ्लॅट क्र. ००१, तळमजला, सिद्धीविनायक अपार्टमेंट, शिवाजी नगर, ६७/२, नवीन गट क्र. २३३, प्लॉट क्र. ८/१ एस, सालवद, बोईसर (प), ठाणे, महाराष्ट्र – ४०१५०१
एलएक्सपीएल००३१५–१६००१६७५९ / संजय विश्वनारायण पांडे / मृदुला संजय पांडे / भास्कर सुरेशप्रसाद मिश्रा	२६–०९–२०१९ / रु. १०३६५१८/– (रुपये दहा लाख छत्तीस हजार पाचशे अठरा मात्र)	फ्लॅट क्र. २०५, २ रा मजला, शुभ गृह कॉम्प्लेक्स, बिल्डिंग क्र. एसआय ९, टाटा हाऊस जवळ, बेटेगाव, बोईसर, पूर्व, पालघर, ठाणे, महाराष्ट्र – ४०१२०३
एलएक्सटीआयटी००११८–१९००७१९३९ / विश्वनाथ नागरंजन / लक्ष्मी सक्सेना	२६–०९–२०१९ / रु. २१०९७५२/– (रुपये एकवीस लाख नऊ हजार सातशे बावन्न मात्र)	फ्लॅट क्र. ३१०, ३ रा मजला, जेपी रेजन्सी, बी विंग, दिप्टी स्काय सिटी जवळ, अंबरनाथ, ठाणे, महाराष्ट्र – ४२१००५

जर सदर कर्जदारांनी वरीलप्रमाणे एएचएफसीएल ला प्रदान करण्यात कसूर केली तर, एएचएफसीएल खर्च आणि परिणाम अशा सर्वस्वी सदर कर्जदारांच्या जोखमीवर ॲक्टच्या कलम १३(४) आणि प्रयोज्य नियमांच्या अंतर्गत वरील तारण मत्तांच्या विरोधात कार्यवाही करेल. सदर कर्जदारांना एएचएफसीएलच्या लेखी पूर्व सहमतीशिवाय विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य मार्गाने वरील सदर मत्ता हस्तांतर करण्यापासून अधिनियमाच्या अंतर्गत प्रतिबंध करण्यात येत आहे. कोणीही व्यक्तीने सदर अधिनियम किंवा नियमांचे उल्लंघन केल्यास अधिनियमाच्या अंतर्गत कारावास आणि/किंवा दंडास पात्र राहतील.

सही/–
दिनांक : ०५.११.२०१९ **प्राधिकृत अधिकारी**
ठिकाण : महाराष्ट्र **ॲस्पायर होम फायनान्स कॉर्पोरेशन लि. करिता**